भारत आज जे बोलतो, त्याला जग उद्याचा आवाज मानते!

‘राष्ट्रीय युवा महोत्सवा’च्या उद्घाटनाप्रसंगी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे प्रतिपादन

नवी दिल्ली, दि. १२ (वृत्तसंस्था) : ‘‘आज जग भारताकडे आशेने आणि विश्वासाने बघत आहे. कारण, भारताची लोकसंख्या ही तरुण आहे आणि भारताचे मनही तरुण आहे. भारताच्या क्षमतांमध्ये आणि त्याच्या स्वप्नांमध्ये तरुणाई आहे. भारत त्याच्या विचारांनीही आणि चेतनेनेदेखील तरुण आहे. भारताच्या विचारांनी आणि तत्त्वज्ञानाने नेहमीच बदल स्वीकारले आहेत आणि म्हणूनच भारताच्या प्राचीनतेत आधुनिकता आहे. आज भारतातील तरुणांमध्ये कठोर परिश्रम करण्याची क्षमता आहे, तर भविष्याबाबतही स्पष्टता आहे. त्यामुळेच भारत आज जे बोलतो, त्याला जग उद्याचा आवाज मानते,’’ असे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बुधवारी दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून पुदुच्चेरी येथे २५व्या ‘राष्ट्रीय युवा महोत्सवा’चे उद्घाटन केले. त्यावेळी ते बोलत होते.

पंतप्रधानांनी सांगितले की, ‘‘आपल्या स्वातंत्र्य चळवळीत असे अनेक लढाऊ सेनानी होऊन गेले, ज्यांना त्यांच्या योग्यतेइतकी मान्यता मिळाली नाही. आपले तरुण अशा निष्ठावंत व्यक्तींबद्दल जितके लिहितील, संशोधन करतील, तितकी देशाच्या आगामी पिढ्यांमध्ये त्यांच्याबद्दलची जागरुकता अधिक वाढेल. ‘राष्ट्रीय युवक महोत्सवा’चा उद्देश भारतातील युवकांच्या मनांना आकार देण्यासाठी आणि राष्ट्राच्या एकत्रित सामर्थ्यात त्यांचे रुपांतर करण्यासाठी आहे. सामाजिक सामंजस्य तसेच बौद्धिक आणि सांस्कृतिक एकत्रीकरणासाठी केलेला हा सर्वात मोठा अभ्यास आहे. याचा उद्देश भारतातील विविध संस्कृतींना जवळ आणून त्यांना ‘एक भारत, श्रेष्ठ भारत’ च्या एकत्रित धाग्यात गुंफून संचालित करण्याचा प्रयत्न आहे.’’

पुढे ते म्हणाले, ‘‘जुलूमशाहीच्या काळात गुरुगोविंद सिंहजी यांच्या साहिबजादे सारख्या तरुणांचे बलिदान आजही आपल्याला मार्गदर्शन करत आहे. भारताला स्वातंत्र्यासाठी बलिदानाची गरज असताना भगतसिंग, चंद्रशेखर आझाद आणि नेताजी सुभाषचंद्र बोस यांसारखे तरुण क्रांतिकारक देशासाठी आपले जीवन समर्पित करण्यासाठी पुढे आले. जेव्हा जेव्हा देशाला आध्यात्मिक पुनरुत्थानाची गरज असते तेव्हा अरबिंदो आणि सुब्रमण्य भारती यांसारखी महान व्यक्तिमत्त्वे त्याठिकाणी मार्गदर्शक ठरतात.’’

‘‘या स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षातील त्यांची जयंती अधिक प्रेरणादायी आहे. श्री. अरबिंदो यांची १५० वी जयंती आणि महाकवी सुब्रमण्यम भारती यांची १००वी पुण्यतिथीदेखील याच काळात येत असल्याने या कालावधीचे अतिरिक्त महत्त्व पंतप्रधानांनी नमूद केले. या दोन्ही महान व्यक्तींचे पुदुच्चेरीशी विशेष नाते आहे. या दोन्ही व्यक्ती एकमेकांच्या साहित्यिक आणि आध्यात्मिक प्रवासात साथीदार राहिल्या आहेत,’’ असे पंतप्रधान म्हणाले. या कार्यक्रमाला संबोधित करताना पंतप्रधानांनी ‘राष्ट्रीय युवा दिना’निमित्त देशवासीयांना शुभेच्छा दिल्या. स्वामी विवेकानंदांना वंदन करून पंतप्रधान म्हणाले की, ‘‘भारतातील तरुणांकडे लोकसंख्येच्या लाभांशासह लोकशाही मूल्ये आहेत, त्यांचा लोकशाही लाभांशदेखील अतुलनीय आहे,’’ असे सांगत ‘‘भारत आपल्या तरुणांना लोकसंख्येचा लाभांश तसेच विकासाचा चालक मानतो,’’ हे पंतप्रधानांनी अधोरेखित केले. भारतातील तरुणांना तंत्रज्ञानाचे आकर्षणही आहे आणि लोकशाहीचे भानही आहे. मुले आणि मुली समान आहेत, यावर सरकारचा विश्वास असल्याचे पंतप्रधानांनी नमूद केले. या विचारसरणीमुळे, मुलींचे लग्नाचे वय २१ वर्षांपर्यंत वाढविण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. मुलीदेखील त्यांचे करिअर घडवू शकतात, त्यासाठी त्यांना जास्त वेळ मिळावा, या दिशेने उचललेले हे एक अतिशय महत्त्वाचे पाऊल असल्याचेही पंतप्रधानांनी अधोरेखित केले.

‘करू शकतो’ ही भावना प्रत्येक पिढीसाठी प्रेरणादायी

पंतप्रधान म्हणाले की, ‘‘स्वातंत्र्याच्या वेळी तरुण पिढीने देशासाठी सर्वस्व अर्पण करण्यास क्षणभरही मागेपुढे पाहिले नाही. आजच्या तरुणांना देशासाठी जगायचे आहे आणि आपल्या स्वातंत्र्यसैनिकांची स्वप्ने पूर्ण करायची आहेत. तरुणांमधील क्षमता जुन्या रूढीवादी विचारांचे ओझे वाहत नाही, ते कसे झटकायचे, हे त्यांना माहीत आहे. आजची ही तरुणाई नवीन आव्हाने, नवीन मागण्यांनुसार स्वतःचा आणि समाजाचा विकास करू शकते आणि नवनिर्मिती करू शकते. आजच्या तरुणांमध्ये असलेली ‘करू शकतो’ ही भावना प्रत्येक पिढीसाठी प्रेरणादायी आहे.’’

सूक्ष्म, लघु, मध्यम उद्योग मंत्रालयाच्या तंत्रज्ञान केंद्राचेही उद्घाटन

दरम्यान, यावेळी पंतप्रधानांनी ‘माझ्या स्वप्नातील भारत’ आणि ‘भारतीय स्वातंत्र्य चळवळीचे दुर्लक्षित नायक’ या विषयावरील निवडक निबंधांचे प्रकाशन केले. या दोन विषयांवर लाखांहून अधिक तरुणांनी सादर केलेल्या निबंधांमधून हे निबंध निवडण्यात आले आहेत. पुदुच्चेरी येथे सुमारे १२२ कोटी रुपयांच्या गुंतवणुकीसह स्थापन करण्यात आलेल्या सूक्ष्म, लघु, मध्यम उद्योग मंत्रालयाच्या तंत्रज्ञान केंद्राचे उद्घाटनही पंतप्रधानांनी केले. पुदुच्चेरी सरकारने सुमारे २३ कोटी रुपये खर्चून बांधलेल्या पेरुंथलैवर कामराजर मणिमंडपम – खुल्या रंगमंदिरासह प्रेक्षागृहाचे उद्घाटनही मोदी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी केंद्रीय मंत्री अनुराग सिंह ठाकूर, नारायण राणे, भानु प्रतापसिंह वर्मा आणि निशिथ प्रामाणिक, डॉ तमिलीसाई सौंदर्यराजन, पुदुच्चेरीचे मुख्यमंत्री एन. रंगास्वामी, राज्यमंत्री आणि संसद सदस्य उपस्थित होते.

पंतप्रधानांच्या हस्ते तामिळनाडूतील ११ नवीन वैद्यकीय महाविद्यालयांचे उद्घाटन

‘सीआयसीटी’च्या नवीन संकुलाचाही शुभारंभ

नवी दिल्ली, दि. १२ (विशेष प्रतिनिधी): पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बुधवार, दि. १२ जानेवारी रोजी ‘व्हिडिओ कॉन्फरन्स’द्वारे तामिळनाडूतील ११ नवीन वैद्यकीय महाविद्यालये आणि ‘सेंट्रल इन्स्टिट्यूट ऑफ क्लासिकल तामिळ’ (CICT) च्या नवीन संकुलाचे उद्घाटन केले. यावेळी केंद्रीय मंत्री डॉ. मनसुख मांडवीय, डॉ. एल. मुरुगन आणि डॉ. भारती पवार, तामिळनाडूचे मुख्यमंत्री एम. के. स्टॅलिन उपस्थित होते. दरम्यान, पंतप्रधान गुरुवार, दि. १३ जानेवारी रोजी सर्व राज्यांच्या मुख्यमंत्र्यांशी ‘व्हिडिओ कॉन्फरन्सिंग’द्वारे देशातील कोरोना संसर्गस्थितीविषयी चर्चा करणार आहेत.

यावेळी संबोधित करताना पंतप्रधान म्हणाले की, ‘‘डॉक्टरांची कमतरता ही अनेक वर्षांपासूनची समस्या होती आणि सध्याच्या सरकारने ही गंभीर त्रुटी दूर करण्यास प्राधान्य दिले. २०१४ मध्ये देशात ३८७ वैद्यकीय महाविद्यालये होती. गेल्या सात वर्षांत ही संख्या ५९६ वर गेली आहे. ही वाढ ५४ टक्के आहे. २०१४ मध्ये भारतात वैद्यकीय पदवी आणि पदव्युत्तर पदवीच्या सुमारे ८२ हजार जागा होत्या. गेल्या सात वर्षांत ही संख्या सुमारे १ लाख, ४८ हजार जागांवर गेली असून ही वाढ सुमारे ८० टक्के आहे. देशात २०१४ पर्यंत केवळ सात ‘अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्था’ अर्थात ‘एम्स’ असल्याचे पंतप्रधानांनी सांगितले. ते पुढे म्हणाले, ‘‘२०१४ नंतर मान्यताप्राप्त ‘एम्स’ची संख्या २२ वर पोहोचली आहे. त्याचवेळी वैद्यकीय शिक्षण क्षेत्र अधिक पारदर्शक करण्यासाठी विविध सुधारणा हाती घेण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

वैद्यकीय महाविद्यालयांच्या उद्घाटनाचा विक्रम मोडीत

तामिळनाडूमध्ये एकाच वेळी ११ वैद्यकीय महाविद्यालयांचे उद्घाटन करून अलीकडेच उत्तर प्रदेशात नऊ वैद्यकीय महाविद्यालयांच्या उद्घाटनाचा स्वतःचाच विक्रम मोडला, याकडे पंतप्रधानांनी लक्ष वेधले. रामनाथपुरम आणि विरुधुनगर या दोन महत्त्वाकांक्षी जिल्ह्यांसह निलगिरीच्या डोंगराळ जिल्ह्यात महाविद्यालये स्थापन करून प्रादेशिक असमतोल दूर केला जात असल्याबद्दल त्यांनी आनंद व्यक्त केला.

थोडक्यात

अभाविपतर्फे स्वामी विवेकानंद यांना अभिवादन

ठाणे : स्वामी विवेकानंद जयंतीनिमित्त राष्ट्रीय ‘युवक दिना’चे औचित्य साधून अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेने बुधवार, दि. १२ जानेवारी रोजी अभिवादन सभेचे आयोजन केले होते. नौपाडा येथील वामनराव ओक रक्तपेढीच्या परिसरात अभाविप कार्यकर्त्यांनी स्वामी विवेकानंद यांच्या कार्याचे स्मरण केले. स्वामी विवेकानंद यांचे विचार आणि कार्य महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये रुजविण्याचा संकल्प यावेळी अभाविपच्या कार्यकर्त्यांनी केला. यावेळी वामनराव ओक रक्तपेढीचे डॉक्टर आणि अन्य कर्मचारी वृंद उपस्थित होता. उपस्थित कार्यकर्त्यांना रक्तपेढीच्या कामकाजाची माहिती देण्यात आली.

मुंबई अखिल भारतीय अधिवक्ता परिषदेतर्फे अभिवादन सभा

मुंबई : राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त मुंबई येथील अखिल भारतीय अधिवक्ता परिषदेतर्फे अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. ‘बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र व गोवा’चे माजी अध्यक्ष व सदस्य ॲड. सुभाष घाटगे यांच्या कार्यालयामध्ये बुधवारी हा कार्यक्रम संपन्न झाला. प्रारंभी दोन्ही प्रतिमांना पुष्प अर्पण करून आदरांजली वाहण्यात आली. यावेळी कोकण प्रांत सहसचिव ॲड. चंद्रकांत चव्हाण, ॲड. नील हेळेकर, ॲड. गुरुदास टक्के यांनी उद्बोधन केले. यावेळी मुंबई युनिटच्या अध्यक्षा ॲड. अंजली हेळेकर तसेच चिटणीस/ सचिव ॲड. श्रीराम रेडीज, कोकण प्रांत सचिव ॲड. आनंद नायक आदी मान्यवर उपस्थित होते.

फॉर्म ए

जाहीर उद्घोषणा

(भारतीय नादारी आणि दिवाळखोरीपणा मंडळ (कॉर्पोरेट व्यक्तींकरिता दिवाळखोरी ठराव प्रक्रिया) विनियमन, २०१६ च्या विनियमन ६ अन्वये)

परफेक्ट मोबाईल ॲण्ड कम्युनिकेशन्स प्रा. लि.च्या धनकोंचे लक्ष वेधण्याकरिता

संबंधित तपशील

१.	कॉर्पोरेट धनकोचे नाव	**परफेक्ट मोबाईल ॲण्ड कम्युनिकेशन्स प्रा. लि.**
२.	कॉर्पोरेट धनकोच्या स्थापनेचा दिनांक	२४ सप्टेंबर, २००७
३.	प्राधिकरण ज्या अंतर्गत कॉर्पोरेट धनकोची स्थापना/नोंदणीकरण झाले	आरओसी - मुंबई
४.	कॉर्पोरेट धनकोचा कॉर्पोरेट ओळख क्रमांक / मर्यादित दायित्व ओळख क्रमांक	U51909MH2007PTC174426
५.	कॉर्पोरेट धनकोच्या नोंदणीकृत कार्यालयाचा आणि प्रमुख कार्यालयाचा (जर असल्यास) पत्ता	गाळा क्र. १६, रत्ना ज्योती इंडस्ट्रियल प्रिमायसेस सीएचएस इर्ला गावठाण, इर्ला लेन, विलेपार्ले (पश्चिम), मुंबई, मुंबई शहर, महा. ४०००५६ भारत
६.	कॉर्पोरेट धनकोच्या संदर्भात दिवाळखोरी सुरु होण्याचा दिनांक	आदेशाचा दिनांक ०७ जानेवारी, २०२२ आदेश दि. १२ जानेवारी, २०२२ रोजी प्राप्त झाला
७.	दिवाळखोरी ठराव प्रक्रिया परिसमाप्तीचा अंदाजित दिनांक	११ जुलै, २०२२ (आदेश प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून १८० दिवस)
८.	अंतरिम ठराव व्यावसायिक म्हणून काम पाहणाऱ्या दिवाळखोरी व्यावसायिकाचा नाव आणि नोंदणीकरण क्रमांक	**नाव: श्री. मुकेश कुमार जैन** **नोंद. क्र.:** IBBI/IPA-001/IPA-P01236/2018-19/11944
९.	मंडळाकडे नोंदणीकृत असल्यानुसार, अंतरिम ठराव व्यावसायिकाचा पत्ता आणि ईमेल	**पत्ता:** सी-२०३, एज, मारुती सुझुकी एरेनाच्या समोर, विधानसभा रोड, मोव्हा, रायपूर - ४९२००७ (सी.जी.) **ईमेल:** mkj2822@gmail.com
१०.	अंतरिम ठराव व्यावसायिकासह पत्रव्यवहाराकरिता वापरावयाचा पत्ता आणि ईमेल	**पत्ता:** सी-२०३, एज, मारुती सुझुकी एरेनाच्या समोर, विधानसभा रोड, मोव्हा, रायपूर - ४९२००७ (सी.जी.) **ईमेल:** cirp.perfectmcpl@gmail.com
११.	दावे सादर करण्याचा अंतिम दिनांक	२६ जानेवारी, २०२२ (आयआरपी द्वारे आदेश प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून १४ दिवस)
१२.	अंतरिम ठराव व्यावसायिकाद्वारे निश्चित केल्यानुसार, कलम २१ च्या उप-कलम (६अ) च्या खंड (ब) अन्वये धनकोंचे वर्ग, जर असल्यास.	आजपर्यंत आयआरपीकडे उपलब्ध असलेल्या माहितीनुसार लागू नाही
१३.	वर्गामध्ये धनकोचा प्राधिकृत प्रतिनिधी म्हणून काम करण्याकरिता ठरविण्यात आलेल्या दिवाळखोरी व्यावसायिकांची नावे (प्रत्येक वर्गामध्ये तीन नावे)	लागू नाही
१४.	अ) संबंधित अर्ज आणि ब) अधिकृत प्रतिनिधींचा तपशील उपलब्ध असेल :	अ) वेब लिंक: http://www.ibbi.gov.in/home/downloads किंवा भौतिक पत्ता: वरील मुद्दा १० नुसार ब) आजपर्यंत आयआरपीकडे उपलब्ध असलेल्या माहितीनुसार लागू नाही

याद्वारे सूचना देण्यात येते की, राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण मुंबई खंडपीठ यांनी **दिनांक ०७ जानेवारी, २०२२ रोजी मे. परफेक्ट मोबाईल्स ॲण्ड कम्युनिकेशन्स प्रायव्हेट लिमिटेड**ची कॉर्पोरेट दिवाळखोरी ठराव प्रक्रिया सुरु करण्याचे आदेश दिले आहेत.

मे. परफेक्ट मोबाईल्स ॲण्ड कम्युनिकेशन्स प्रायव्हेट लिमिटेडच्या धनकोंना याद्वारे त्यांचे दावे पुराव्यासह **दिनांक २६ जानेवारी, २०२२** रोजी किंवा त्यापूर्वी अंतरिम ठराव व्यावसायिक यांच्याकडे नोंद क्र. १० समोर नमूद पत्त्यावर सादर करण्यास सांगण्यात येत आहे.

वित्तीय धनको यांनी दाव्याबाबतचे त्यांचे पुराव्यासहीत दावे फक्त इलेक्ट्रॉनिक पद्धतीने सादर करावे. इतर सर्व धनको त्यांचे दाव्याबाबतचे पुरावे व्यक्तिशः, टपालाद्वारे किंवा इलेक्ट्रॉनिक पद्धतीने सादर करु शकतात. दावे त्यांच्या निर्दिष्ट अर्जामध्ये सादर करता येतील- फॉर्म बी - कार्यरत धनको (कामगार आणि कर्मचारी वगळता), फॉर्म सी - वित्तीय धनको, फॉर्म सीए - ए वर्गातील वित्तीय धनको, फॉर्म डी - कामगार/ कर्मचारी, फॉर्म ई - कामगार आणि कर्मचाऱ्यांचे प्राधिकृत प्रतिनिधी आणि फॉर्म एफ - इतर धनको.

नोंद क्र. १२ समोर नमूद केल्यानुसार वर्गाशी संबंधित वित्तीय कर्जदाराने, फॉर्म सीएमधील वर्गाचे (वर्ग नमूद करावा) अधिकृत प्रतिनिधी म्हणून काम पाहण्याकरिता नोंद क्र. १३ समोर नमूद तीन दिवाळखोरी व्यावसायिकांमधून अधिकृत प्रतिनिधी म्हणून त्यांची पसंती नमूद करावी.

दाव्याबाबतचे चुकीचे किंवा दिशाभूल करणारे दावे सादर केल्यास दंड ठोठावण्यात येईल.

मुकेश कुमार जैन
अंतरिम ठराव व्यावसायिक

दिनांक: १३.०१.२०२२
ठिकाण: रायपूर (सी.जी.)

नोंद. क्र.: IBBI/IPA-001/IPA-P01236/2018-19/11944
परफेक्ट मोबाईल्स ॲण्ड कम्युनिकेशन्स प्रायव्हेट लिमिटेडच्या प्रकरणात

देशाच्या सुरक्षिततेविषयी खिल्ली उडवणे चिंताजनक : चंद्रकांतदादा पाटील

कोल्हापूर, दि. १२ (तभा वृत्तसेवा): ‘‘पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा गाड्यांचा ताफा पंजाबमध्ये एका उड्डाणपुलावर २० मिनिटे अडकणे हा त्यांच्या हत्येसाठी घातपाताचा पूर्वनियोजित प्रयत्न होता, हे एका वृत्तवाहिनीने केलेल्या ‘स्टिंग ऑपरेशन’मुळे स्पष्ट झाले आहे. देशाच्या सुरक्षिततेविषयीच्या या गंभीर प्रकाराबाबत भारतीय जनता पक्ष जनजागरण करेल,’’ असा इशारा भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रकांतदादा पाटील यांनी बुधवारी कोल्हापूर येथे पत्रकारांशी बोलताना दिला.

‘‘हा घातपाताचा आणि पंतप्रधानांच्या हत्येचा प्रयत्न होता, हे आता तरी काँग्रेस पक्षाने आणि त्यांच्या पंजाब सरकारने मान्य केले पाहिजे. पंतप्रधानांच्या हत्येच्या कटाची काँग्रेस नेते खिल्ली उडवतात. देशाच्या सुरक्षिततेविषयीच्या गंभीर विषयांची खिल्ली उडवणे चिंताजनक आहे,’’ असेही चंद्रकांतदादा पाटील म्हणाले.

ते म्हणाले की, ‘‘पंतप्रधानांच्या सुरक्षाव्यवस्थेबाबत घडलेली घटना किरकोळ असल्याचे सांगून काँग्रेसचे नेते खिल्ली उडवतात. तथापि, ‘स्टिंग ऑपरेशन’मुळे स्पष्ट झाले आहे की, पंतप्रधानांच्या मार्गावर आंदोलन होणार, याची माहिती स्थानिक पोलिसांनी दोन तीन दिवस आधी उच्च पदस्थांना देऊनही कारवाई करू नका, अशा सूचना देण्यात आल्या. ही घटना घडली तेथून पाकिस्तानची सीमा अगदी दहा किलोमीटर अंतरावर आहे. हे ठिकाण ‘ड्रोन’ हल्ल्याच्या टप्प्यात आहे.’’

हा प्रकार काँग्रेस सरकार आणि पक्षाच्या समन्वयाने झाला का?

‘‘या विषयात पंजाब काँग्रेस सरकारच्या मुख्यमंत्र्यांनी त्या पक्षाच्या नेत्या प्रियांका गांधी यांना ‘ब्रीफिंग’ केले. प्रियांका गांधी या कोणत्याही घटनात्मक पदावर नसताना त्यांना मुख्यमंत्र्यांनी माहिती देणे म्हणजे हा प्रकार काँग्रेस सरकार आणि पक्षाच्या समन्वयाने झाला का, अशीही शंका उत्पन्न होत आहे,’’ असे चंद्रकांतदादा पाटील म्हणाले.

‘हायकमांड’ नव्हे, तर पंजाबची जनता ठरवणार मुख्यमंत्री

(पान १ वरुन) करणार असल्याचे स्पष्ट आहे,’’ असे सिद्धू यांनी म्हटले आहे.

दरम्यान, सिद्धू यांनी मुख्यमंत्री चन्नी यांना विश्वासात न घेताच काँग्रेसच्या ‘पंजाब मॉडेल’ची घोषणादेखीस करून टाकली आहे. त्याविषयी पक्षाच्या सरचिटणीस प्रियांका गांधी–वाड्रा यांच्याशी आपली चर्चा झाली असून पक्षाच्या अधिकृत जाहीरनाम्यातही या ‘मॉडेल’चा समावेश केला जाणार असल्याचा दावाही सिद्धू यांनी केला आहे.

‘इस्रो’च्या अध्यक्षपदी एस. सोमनाथ

(पान १ वरुन) एस. सोमनाथ ‘जीसॅट–८ए’ आणि ‘पीएसएलव्ही–सी४१’ ला अधिक उन्नत करण्याच्या कामातही व्यस्त होते. जेणेकरून ‘रिमोट सेन्सिंग सॅटेलाईट्स’ना अधिक योग्य प्रकारे प्रक्षेपित करता येईल.

एस. सोमनाथ यांनी एर्नाकुलमच्या महाराजा कॉलेजमधून पदवीपूर्व शिक्षण घेतले असून नंतर केरळ विद्यापीठाच्या क्लिलॉनस्थित ‘टीकेएम कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग’मधून त्यांनी ‘मेकॅनिकल इंजिनिअरिंग केले. पुढे इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्सेस’मधून त्यांनी ‘एअरोस्पेस इंजिनिअरिंग’मध्ये पदव्युत्तर पदवी प्राप्त केली. ‘रॉकेट डायनॅमिक्स’ आणि ‘कंट्रोल’चे ते विशेषज्ञ आहेत.

पदवीनंतरच सन १९८५मध्ये ‘एस. सोमनाथ विक्रम साराभाई स्पेस सेंटर’मध्ये रुजू झाले. सुरुवातीच्या काळात ते ‘पीएसएलव्ही’ प्रकल्पावर ते काम करत होते. नंतर त्यांना २०१० मध्ये ‘जीएसएलव्ही–एमके–३ रॉकेट’चे प्रकल्प संचालक म्हणून नेमले गेले. २०१५ मध्ये ते ‘एलपीएससी’चे अध्यक्ष झाले. २०१८ मध्ये ते ‘व्हीएसएससी’चे संचालक झाले.

केंद्रीय खनिज कायद्याला राज्याची स्थगिती; राज्यपाल, केंद्र सरकारकडे तक्रार करणार

भाजप आमदार चंद्रशेखर बावनकुळे यांचा इशारा

नागपूर, दि. १२ (तभा वृत्तसेवा): ‘‘केंद्र शासनाच्या खनिज निधीचा कायदेशीरदृष्ट्या विनियोग केला जावा, यासाठी केंद्र शासनाने २३ एप्रिल, २०२१ रोजी खनिज कायद्यात काही दुरुस्त्या केल्या. पण राज्य शासनाने या कायद्याला एका पत्राद्वारे स्थगिती दिली आहे. खनिज निधीमध्ये अनियमितता करण्यासाठीच ही स्थगिती देण्यात आली आहे,’’ असा आरोप भाजपचे विधान परिषदेचे आमदार चंद्रशेखर बावनकुळे यांनी केला आहे. बुधवारी माध्यमांशी बोलताना त्यांनी हा आरोप केला. यासंदर्भात आपण राज्यपालांकडे व केंद्रीय खनिज मंत्रालयाकडे तक्रार करणार आहोत. तसेच उच्च न्यायालयातही या स्थगितीविरूद्ध दाद मागू, असा इशाराही आ. बावनकुळे यांनी पत्रकार परिषदेतून दिला आहे.

‘‘केंद्र सरकारचा खनिज कायदा आहे, हा राज्य सरकारचा नाही. प्रत्येक जिल्ह्यात एक ‘खनिज प्रतिष्ठान’ तयार करण्यात आले आहे. या प्रतिष्ठानचा निधी कायद्यानुसार खर्च केला जावा म्हणून केंद्र शासनाने २३ एप्रिल, २०२१ ला या कायद्यात सुधारणा केल्या. जिल्हाधिकारी या प्रतिष्ठानचे अध्यक्ष आणि खासदार व आमदारांची या प्रतिष्ठानमध्ये नियुक्ती करण्याची तरतूद कायद्यात करण्यात आली. कायद्यातील या दुरुस्तीमुळे केंद्रीय कायद्यानुसार वसूल केलेला निधी कायदेशीर वापरण्याचे बंधन असताना या निधीत अनियमितता व भ्रष्टाचार करण्याच्या उद्देशाने राज्य शासनाने या कायद्याला स्थगिती दिली. या प्रतिष्ठानचा निधी कुठे व किती वापरावा, हे कायद्यात स्पष्ट करण्यात आले. पण या निधीचा दुरुपयोग करता यावा म्हणून त्याला स्थगिती देण्यात आली. हे कृत्य नियमबाह्य आहे. यासंदर्भात आपण राज्यपालांकडे व केंद्रीय खनिज मंत्रालयाकडे तक्रार करणार आहोत. तसेच उच्च न्यायालयात या स्थगितीला आव्हान देणार व खनिज प्रतिष्ठानच्या निधीत भ्रष्टाचार होऊ देणार नाही,’’ असेही आ. बावनकुळे यांनी म्हटले आहे.

भाजपकडून ‘ओबीसीं’ना सर्वाधिक न्याय

‘‘भारतीय जनता पक्षाने या देशात ओबीसींना सर्वाधिक न्याय दिला. ओबीसींना न्याय देऊन विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे कामही याच पक्षाने केले. त्यामुळे भाजप ओबीसी विरोधी असल्याचा आरोप करणाऱ्यांना या राज्यातील ओबीसी जनताच धडा शिकविणार आहे,’’ असा विश्वास चंद्रशेखर बावनकुळे यांनी व्यक्त केला.

राऊतांची विधाने कपोलकल्पित

खा. संजय राऊत यांच्या एका विधानावर बोलताना आ. बावनकुळे म्हणाले की, ‘‘संजय राऊत दिवसभर टीव्हीवर राहण्यासाठी विपरित विधाने करीत असतात. त्यांची विधाने कपोलकल्पित आहेत. त्यांच्या शब्दावर किती विश्वास ठेवायचा, हे आता जनतेला कळले आहे. महाविकास आघाडी सरकार सतत मागासवर्गीय व दलित समाजावर अन्याय करीत आहे. सरकारच्या अन्यायाची अनेक प्रकरणे समोर येत आहे. पण सरकार मागासवर्गीयांची दखलच घेत नाही. हे सरकार खऱ्या अर्थाने संवेदनशील असेल तर त्यांनी मागासवर्गीयांच्या समस्यांना प्राधान्य देऊन त्या सोडवाव्या,’’ असेही आ. बावनकुळे म्हणाले.

राज्य सरकारकडून विदर्भातील शेतकरी वाऱ्यावर : आ. बावनकुळे

‘‘गेल्या तीन दिवसांपासून पूर्व व पश्चिम विदर्भात अवकाळी पाऊस व गारपिटीने शेतकऱ्यांच्या पिकांचे प्रचंड नुकसान झाले आहे. कापूस, हरबरा, तूर, गहू, संत्रे, मोसंबी ही पिके शेतकऱ्यांच्या हातातून गेली. पण, शासनदरबारी अजून कोणतीच दखल घेतली गेली नाही. विदर्भातील शेतकऱ्याला महाराष्ट्र विकास आघाडीच्या सरकारने वाऱ्यावर सोडले आहे,’’ असा आरोपही आ. चंद्रशेखर बावनकुळे यांनी केला आहे.

पंतप्रधान सुरक्षा त्रुटी : न्यायमूर्ती इंदू मल्होत्रा समिती करणार तपास

(पान १ वरुन) आहे. समितीस आपला अहवाल लवकरात लवकर सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सुरक्षा त्रुटींविषयी ‘लॉयर्स व्हॉईस’ या संस्थेने सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. याचिकेवर सरन्यायाधीश न्या. एन. व्ही. रामण्णा, न्या. सूर्यकांत आणि न्या. हिमा कोहली यांच्या खंडपीठासमोर सुनावणी सुरू आहे. यापूर्वी सोमवारी झालेल्या सुनावणीवेळी न्यायालयीन समितीमार्फत चौकशी करण्यात येईल, असे स्पष्ट करण्यात आले होते. त्याचवेळी केंद्र सरकार आणि पंजाब सरकारने याप्रकरणी नेमलेल्या चौकशी समित्यांना आपले काम थांबविण्याचेही निर्देश यापूर्वीच देण्यात आले आहेत.

इस्लाम सोडणाऱ्यांनी स्थापन केली ‘एक्स मुस्लीम्स ऑफ केरल’ संघटना

(पान १ वरुन) अधिकारांना सुनिश्चित केले आहे. आम्ही धार्मिक परंपरा वा प्रथांच्या नावावर केल्या गेलेल्या मूलभूत मानवी अधिकारांचे उल्लंघन करणाऱ्या सर्वच अत्याचारांविरोधात न्यायालयात जाण्याचीही योजना तयार करत आहोत.’’

दरम्यान ९ जानेवारीलाच ‘एक्स मुस्लीम्स डे’ साजरा करण्याबाबत लियाक्कथली म्हणाले की, ‘‘गेल्या वर्षी याच दिवशी इस्लामी उपदेशक एम. एम. अकबर आणि ई. ए. जब्बार यांच्यात इस्लामवरुन वाद झाला होता. समाजमाध्यमांवरही हा वाद मोठ्या प्रमाणावर प्रसारित झाला होता. इस्लामवरील उघड टीकेने मार्ग प्रशस्त केला आणि कितीतरी लोकांना धर्म सोडण्यासाठी प्रेरणा दिली. म्हणूनच ९ जानेवारी ‘एक्स मुस्लीम्स डे’ म्हणून साजरा केला जावा, अशी आमची इच्छा आहे.’’

युद्ध हा अंतिम पर्याय; त्यातही नक्कीच विजय मिळवू!

(पान १ वरुन) प्राधान्य आहे. बैठकीच्या चौथ्या आणि पाचव्या फेरीत आम्ही ‘पीपी–१४’विषयी चर्चा केली होती. त्यानंतर आठव्या आणि नवव्या फेरीमध्ये उत्तर पँगाँग त्सो आणि कैलास पर्वतरांगांवर चर्चा झाली. मात्र, प्रत्येक फेरी यशस्वी होईल, अशी अपेक्षा करणे योग्य नाही. सध्याच्या बैठकीचा मुद्दा ‘पीपी–१५’ (हॉटस्प्रिंग) हा असून त्यात यशस्वी होण्याचा भारताचा विश्वास आहे,’’ असेही लष्करप्रमुख म्हणाले.

देशाच्या पश्चिम सीमेवरही भारताची करडी नजर असून नियंत्रण रेषेवर होणारे घुसखोरीचे प्रयत्न भारताने हाणून पाडण्यात यश मिळविले आहे. मात्र, यातून भारताच्या शेजारी देशाचे मनसुबे स्पष्टपणे समोर येत आहेत. मात्र, भारताने अशा प्रत्येक प्रकाराला सडेतोड उत्तर दिले आहे, त्यामुळे संघर्षविरामापासून स्थितीमध्ये सुधारणा झाली आहे. ईशान्येतील परिस्थिती नियंत्रणात आहे. लष्कराच्या अनेक बटालियन हटवण्यात आल्या आहेत. भारत–म्यानमार सीमेवर आसाम रायफल्सच्या बटालियन वाढवण्याची योजना आहे. त्याचप्रमाणे नागालँडमधील घटनेविषयी आवश्यक ती कारवाई करणार आहोत,’’ असेही लष्करप्रमुख जनरल नरवणे यांनी स्पष्ट केले आहे.